२५

# कवि मोरोपंत ह्यांचें चरित्र.

जन्म. १७२९ इ० स० मृत्यु १७९४ इ० स०

श्रीमन्मयूर कविंचीं, देते संतोष मानवां कविता ॥
असता जरि भूमिवरी, सुरगुरु तरि तोहि मान वांकविता॥ १॥
आर्या छंदें जोडुनि, रामायणभारतादि आयकवी ॥
नायक वीर कवींचा, ऐसा होईल अन्य काय कवी ॥ २ ॥
सश्लोक वामनाचा, अभंग वाणी प्रसिद्ध तुकयाची ॥
ओवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूर पंताची ॥ ३ ॥



... २५ कोसांवर बारामती ह्मणून एक गांव ... नाईक जोशी, बाळाजी विश्वनाथ ... जाहागीरदार राहत असत, त्यांच्या ... ह्मणून एक कारकुन होते, ... बाईचे नांव लक्ष्मी बाई. ... जन्मले पुढें कांहीं ... स गेले तेथें

पांडुरंग विठोबा घाणेकर, ... रुपये

यांनीं तयार करून

... या


२२०

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक पां. वि. घाणेकर

सन १९२८

...लय क्रमांक

पुस्तकाचें नांव कोकावली

इतर कां

२५०-आ

# कवि मोरोपंत ह्यांचें चरित्र.

जन्म. १७२९ इ० स० मृत्यु १७९४ इ० स०

श्रीमन्मयूर कविंची, देते संतोष मानवां कविता ॥
असता जरि भूमिवरीं, सुरगुरु तरि तोहि मान वांकविता॥ १॥
आर्या छंदें जोडुनि, रामायणभारतादि आयकवी ॥
नायक वीर कवींचा, ऐसा होईल अन्य काय कवी ॥ २ ॥
सुश्लोक वामनाचा, अभंग वाणी प्रसिद्ध तुकयाची ॥
ओवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूर पंताची ॥ ३ ॥

पुण्यापासून २५ कोसांवर बारामती ह्मणून एक गांव आहे तेथें बाबूजी नाईक जोशी, बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे जामात हे जाहागीरदार राहत असत, त्यांच्या पदरीं रामचंद्र पराडकर ह्मणून एक कारकुन होते, त्यांचे मुलगे मोरोपंत. त्यांच्या आईचे नांव लक्ष्मी बाई. इ० स० १७२९ त पन्हाळगडीं जन्मले पुढें कांहीं दिवसानीं बापास भेटण्या करतां पंत बारामतीस गेले तेथें नाईकांनीं त्यांची विद्वता पाहून सालीना ५०० रुपये वेतन करून पुराण सांगावयास ठेविलें. इ० स० १७८९ त अभिरसिंग जाधवाबरोबर पंत महायात्रेस गेले तेथल्या पंडतानीं ह्यांच्या कविता पाहून फार प्रशंसा केली. तेव्हां पंतास फार आनंद झाला. तेथून परत येतानां अहिल्याबाईला चोळीमहेश्वरी भेटले. तेथें पंतांचा फार आदर सत्कार झाला. हे पाहून पंतानीं तिजवर पांच आर्या रचल्या आहेत.

पंत इ० स० १७९४ या वर्षी मृत्यु पावलें त्यांची आख्या आर्यावरून आहे.

(केकावली) केका ह्मणजे मोराचा शब्द आणि आवली

ह्म० पंक्ती पंतानीं आपणास मयूरपक्षी कल्पून आपण ईश्वरास मारलेल्या हाकानां केकावली अशी संज्ञा दिली आहे.

## यानीं केलेलें ग्रंथ

भारतें ( १८ हिपर्वें ) भागवत् दशमस्कंध व इतर स्कंधातलि फुटकळ आख्यानें. रामायणें ( १०८ आहेत ) व इतर पुराणांतील आख्याना वर आर्या व क्वचित् श्लोक आहेत. ह्या शिवाय पदे व साक्या प्रसिद्ध आहेत.

---

## शुद्धिपत्र.

| पृष्ट. | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | २० | धूल | धूळ. |
| २ | २२ | शरणगत | शरणागत. |
| ३ | १८ | वेलबुटी | वेलबुट्टी. |
| ६ | २ | कोटी गौं[२३] | कोटी[२] गौं[३]. |
| ७ | १८ | कीत्येक | कित्येक. |
| ८ | १६ | जन्मदरिद्री | जन्मदारिद्री. |
| ,, | २१ | स्तुती | स्तुति. |
| ९ | २३ | यासमोर | या समोर. |
| १३ | १६ | शरणगत | शरणागत. |
| ,, | २० | आप हे | आपहे. |
| ,, | २४ | रोगवृक्षतो | रोगवृक्ष तो. |
| २१ | १८ | तान | तीन. |
| ,, | १९ | आपली | आवली. |

---

14

# मयूरकविकृत केकावलि.

सदाश्रितपदा[1] सदाशिवमनोविनोदाऽऽस्पदा[2] ।
स्वदासवशमानसा[3] कलिमलांतका[4] कामदा[5] ॥
वदान्यजनसद्गुरो[6] प्रशमिताऽमिताऽसन्मदा[7] ।
गदारिदरनंदकांबुजधरा[8] नमस्ते[9] सदा ॥ १ ॥
पदाब्जरज[1] जें तुझें सकलपावनाधार[2] तें ।
अघाचलेंहि[3] तारिले[4] बहु तुवांचि राधारतें[5] ॥
अजामिळ[6]-अघासुर[7]-व्रजवधू[8]-बकी[9]-पिंगळा[10] ।
अशां गति दिली उरे न तृण भेटतां विंगळा[11] ॥ २ ॥
तुझ्या बहुत शोधिले[1] अघनिधी[2] पदाच्या[3] रजें ।
न तें अनृतें[4] वर्णिती[5] बुधजनीं सदाचार[6] जें ॥
असें सतत[7] ऐकते सतत बोलते मीच तें ।

---

( १ ) १ (सत्+आश्रित+पद) साधूंनीं आश्रित पद ज्याचे अशा २ शंकराच्या मनास आनंद देणाऱ्या. ३ आपल्या भक्ताच्या स्वाधीन ज्याचें मन आहे अशा. ४ पापाचा नाश कर्त्या अशा. ५ भक्तमनोरथ पूर्ण करणाऱ्या. ६ दात्यांचा सद्गुरु अशा. ७ (प्रशमित+अमित+असत्+मद) असंख्य दुष्टांचा गर्व हरणाऱ्या. ८ गदा, अरि (चक्र,) दर (शंख,) नंदक (खड्ग,) अंबुज (कमळ,) ह्यांस धरणाऱ्या अशा. ९ (नमः+ते) सदोदित तुला नमस्कार असो.

( २ ) १ पद हेंच कोणी एक कमल त्याची धूल. २ पवित्रपणाचें मूळ. ३ महापापी. ४ तारण केले. ५ श्रीकृष्ण. ६, ७ नांवाचे राक्षस. ८ गौळणी. ९ पूतना. १० एका वेश्येचें नांव. ११ निवारा.

प्रमार्ण न ह्मणों जरी उचित माझिया नीचते ॥ ३ ॥
तसांचि उरलों कसा पतित मी नसें काय कीं ।
कृपाचि सरली असें हि न घडे जगन्नार्थकीं ॥
नसेन दिसलों कसा नयन सर्वसाक्षी रवी ।
विर्षाद धरिला म्हणो न सुरभी विष क्षीर वी ॥ ४ ॥
व्रजाऽवन करावया वसविलें नखाग्रीं धरा ।
सलीलें तें मंदराख्येंहि नग स्व-पृष्टीं धरा ॥
वराह-तनु घेउनी उचलिली रदांग्रें धरा ।
सुदुर्धर तुह्मां कसा पतित हा न कां उद्धरा ॥ ५ ॥
नताऽवन- धृत-व्रत-ज्वलनें तूंचि बाधा-वनीं ।
पद-प्रणत-संकटीं प्रजवें तूंचि बा धावनीं ॥

---

(३) १ शुद्ध केले. २ पापाचे समुद्र. ३ पायाच्या एका कणानें. ४ खोटें. ५ वर्णन करतात. ६ (सत्+आचार) चांगल्या आचरणाचें ७ नेहमीं. ८ योग्य. ९ नीचपणा.

(४) १ न उद्धरलेला. २पापी. ३ अथवा. ४(जगत्+नायक)ईश्वराचे. ठिकाणीं ५ सर्व पाहणारा. ६ खेद. ७ ह्मणावें तर. ८ कामधेनु. ९ दूध. १० देई.

(५) १ (व्रज+अवन) गोकुलाचें रक्षण करणें. २ (नख+अग्र) नखाचें टोंक. ३ पर्वत. ४ कौतुकानें. ५ मंदर नांवाचा. ६ पर्वत. ७ आपल्या पाठीवर. ८ धरिली. ९ डुकराचा देह. १० दाताचें टोंक. ११ पृथ्वी. १२ बिकट. १३ उद्धार करणें.

(६) १ (नता+अवन+धृत+व्रत) शरणगतास रक्षावयाचा नियम. २ अग्नि. ३ नम्र झालेल्याचें संकट. ४ वेगवान. ५ धावण्या मध्यें. ६ कोणी. ७ गजेंद्र. ८ द्रौपदीचें संकट निवारण करण्यास. ९ जयाच्या ( अर्जुनाच्या ) जयार्थ. १० अथवा. ११ त्या भारतीय युद्धांत.

दया प्रकट दाखवीं कवणें[६] सांग त्या वारणीं[७] ।
सति-व्यसन[८]-वारणीं जयजयार्थ[९] त्या वां[१०] रणीं[११] ॥ ६ ॥
सुपात्र[१] न रमाहि यद्रतिसुखास[२] दारा[३] परी[४] ।
असा प्रभुहि सेवकां भजसि खासदारापरी ।
प्रिया[५]कुचतटीं जिहीं न बहुवार पत्रावळी[६] ।
तिहीं अमित[७] काढिल्या नृपमखांत[८] पत्रावळी[९] ॥ ७ ॥
न पावसि[१] ह्मणोनि मी ह्मणतसें तुला आळशी ।
वरि न असदुक्ति[२] हे रविसखोत्थिता[३] आळशी[४] ॥
असंख्य[५] जन तर्पिले[६] क्षुधित[७] एकला जेमनीं[८] ।
चुकेल[९] तरि त्यास दे परि वदान्य[१०] लाजे मनीं ॥ ८ ॥
अगा[१] प्रणतवत्सला[२] ह्मणति त्या जना पावला[३] ॥
ह्मणोन तुमच्याच मी स्मरतसें[४] सदा पावलां[५] ॥
करूं वरी कृपा हरूं[६] व्यसन दीन[७] हा तापला[८] ॥
असें मनिं धरा खरा भरंवसा मला आपला ॥ ९ ॥
मला निरखतां भवच्चरण[२]कन्यका आपंगा[३] ।
ह्मणे अगा[४] ऐकिलें[५]हि न कधीं असें[६] पाप गा ॥

---

(७) १ पवित्रस्थान. २ ( यत्+रति+सुखास ) ज्याच्या रतिसुखास ३ स्त्री. ४ परंतु. ५ प्रियेच्या स्तनावर. ६ वेलबुटी. ७ पुष्कळ ८ धर्म राजानें केलेल्या यज्ञांत. ९ उष्टी पानें.

(८) १ प्रसन्न होत नाहींस. २ (असत्+उक्ति) खोटें भाषण. ३ (रवि+सखा+उत्थिता) सूर्याचा सखा 'सत्राजीत' त्यापासून उत्पन्न. ४ अपवाद सदृश. ५ पुष्कळ. ६ तृप्त केलें. ७ भुकेलेला. ८ जेवणामध्यें. ९ चुकलेल्यास. १० दाता.

(९) १ हे. २ शरणागतांचा मित्र. ३ प्रसन्न झाला. ४ नमतसें. ५ पायांनां. ६ हरो. ७ कवि (मोरोपंत.) ८ त्रासला.

कर[६] श्रवणिं[७] ठेविते नुघडि[८] नेत्र[९] घे भीतिलीं[१०] ।
न घालिन भिडेस[११] मी जरिहि कार्यिलोभी[१२] तिला ॥१०॥
सदैव[१] नमितां जरी पद ललाट केलें[२] किणें ।
नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जाविणें[३] ॥
नतों[४] करुन मुक्केंही[५] ह्मणसि मी बुडालों रिणें[६] ॥
अशा तुज न जो भजे[७] मनुज[८] धिक्[९] तयाचें जिणें[१०] ॥११॥
पटुत्व[१] सकलेंद्रियीं[२] मनुजता[३] सुवंशीं[४] जनीं[५] ।
द्विजत्वहि[६] दिलें भलें बहु अलभ्य[७] जें कीं जनीं ॥
यशश्रवणकीर्तनीं[८] रुचि दिली तरी हा वरा[९] ।
ह्मणे अधिक द्याच कीं अखिलं[१०] याचकीं[११] होवरा[१२] ॥१२॥
असें न ह्मणशील तूं वरद वत्सल[१] श्रीकरा[२] ।
परंतु मज भासलें[३] ह्मणूनि जोडितों मी करां[४] ॥

---

(१०) १ पाहतां. २ (भवत्+चरण+कन्यका) तुमच्या पाया पासून उत्पन्न झालेली. ३ नदी (भागिरथी.) ४ अबब. ५ इतकें ६ हात. ७ कानावर. ८ उघडीना. ९ डोळे. १० भित्री होई. ११ भीड घालणें. १२ कार्य साधण्यास तत्पर.

(११) १ सदा २ललाट (कपाळ) किणें (घट्यानें) पद (स्थान) केलें कपाळास जरी घट्टे पडले असा अर्थ. ३(भवत्+पद+अब्ज+विणें.) तुमच्याच चरण कमला शिवाय. ४नम्र. ५ मुकले. ६ कर्ज. ७ नमनें. ८ मनुष्य. ९ धि:कार. १० वाचणें.

(१२) १ दक्षता. २ (सकल+इंद्रिय) सर्व इंद्रियें एकंदर इंद्रियें. दहा आहेत. पांच कर्मेंद्रियें. (१ श्रोत्र. २ चक्षु ३ त्वचा. ४ जिव्हा, ५ घ्राण व पांच ज्ञानेंद्रियें ६ वाचा. ७ हस्त. ८ पाद. ९ पायु १० उपस्थ.) ३ मनुष्यपणा. ४ श्रेष्ठ कुलांत. ५ उत्पत्ति. ६ ब्राह्मणत्व. ७ मिळण्यास कठीण. ८ यशाचे ऐकण्याची कितर्नांत आवड. ९वराला. १०सर्व. ११भिकाऱ्यांत. १२ अधाशी.

दिलें बहु बरें खरें परि गमे कृपा व्यंग ती ।
अलंकृतिर्मितीसती मनिं झुरे न जों संगती ॥१३॥
कराल पुरती दया तरि असो दिलें पावलें ।
परंतु हरि एकदां त्वरितें दाखवा पावलें ॥
प्रसाद करणें मनीं जरी नसेल हें आवरा ।
जयां बहु तयास द्या मज कशास मी हावरा ॥१४॥
दिलें फिरुनि घेतलें अशी अकीर्ति लोकीं न हो ।
सुनिर्मळ तुझीं पदें कधितरी विलोकीन हो ।
निजप्रियजनां कडे तरिहि दे हवाला जशी ॥
पडेल समजाविशी तशि करोत कां लाजशी ॥१५॥
अहो निपट धृष्ट मी प्रभुवरासि कां लाजशी ।
ह्मणे तुज नसो तशी विकृति भाविकाला जशी ॥
परंतु अपराध हा गुरु ह्मणोनि शिक्षा करीं ।

(१३) १ इच्छा पूरक. २ दयानिधे. ३ वाटलें. ४ हात. ५ मागील केकंतल्या ज्या देणग्या त्या. ६ इंद्रिय पटुत्वादि दिलें ती दया. ७ दागिन्यांनीं युक्त. ८ पतिव्रता. ९ खिन्न होई. १० जों कालपर्यंत. ११ पतीचा सहवास.

(१४) १ पोंचलें. २ लौकर. ३ पाय. ४ प्रसन्नता. ५ इंद्रियपटुत्व. ६ आटोपा. ७ ज्याला. ८ अधाशी.

(१५) १ दिलेलें. २ अपकीर्ति. ३ होओ. ४ पवित्र. ५ पाहीन. ६ आपल्या प्रियभक्ताकडे. ७ अधिकार. ८ समजूत.

(१६) १ खेदकारक अव्यय. २ केवळ. ३ दांडगा. ४ कारण मी ईश्वराला सुद्धां कां लाजतोस, असें ह्मणतो. ५ वाईट मनोविकार. ६ सांसारीक जन. ७ ज्या प्रमाणें. ८करतो. ९ न्यायापासून जे भ्रष्ट झालेले त्यांना दमाविण्या करतां. १० अधिकाराचें चिन्ह.

असेचि धरिली नयच्युतदमार्थ दीक्षां करीं ॥ १६ ॥
सदैव अपराध हे रचितसें असे कोटि गों ।
स्वयेंहि कथितों नसे तिळहि लाज मीं कोटिगा ॥
अजांडशतकोटि जा उदरिं सर्वदा नांदवा ।
न त्यांत अवकाश या स्थळ दिल्हें तदां कां दवा ॥ १७ ॥
तुझ्या जिरविले बहु प्रणत-मंतु पोटें पण ।
त्यजी मदपराध हे मजकडेचि खोटेपण ॥
दवाग्नि जठरीं अति-क्षुधित त्यास हें अन्न द्या ।
वि-तृष्ण करिती श्रितां तुमचिया दयासन्नद्या ॥ १८ ॥
न होय कवणाहि तें तुमचियाचि लीलालसें ।
पदें चरित दाविजे त्रिजगदब्जकीलालसें ॥
मदुद्धरण मात्र कां जड तुम्हां दिसे वारिती ।
स्व-क-व्यसन मर्त्यही न करितीच सेवा रिती ॥ १९ ॥

---

(१७) १ रचतो. २ कोट्यवधि. ३ अरे. ४ स्वतः ५ तिळभर सुद्धां ६ शरम. ७ निलाजरा. ८ ( अज + अंड ) ब्रम्हांड. ९ पोटा मध्यें. १० नांदतात. ११ तेव्हां. १२ वणवा.

(१८) १ पचवणें, क्षमा करणें. २ प्रणत—नम्र, मंतु—अपराध. ३ पोटानें ४ (मत् + अपराध) माझा अपराध. ५ (दव + आग्नि) गोकुळांतील भक्षण केलेला अग्नि. ६ पोटांत. ७ अति भूकेलेला. ८ माझे अपराधरूप. ९ तहान रहित. १० आश्रित. ११ दयारूप उत्तम नदि.

(१९) १ लीलेनें. २ ( त्रिजगत् + अब्ज + कीलाल ) त्रैलोक्यरूप कमलाला उदकरूप असें. ३ ( मत् + उद्धार ) माझा उद्धार. ४ दूर करिती. ५ आपल्या भक्तांचें संकट. ६ सामान्य पुरुष.

दयाब्दं वळसील तूं तरि न चातकां सेवकां ।
उणें किमपि भाविकां उबगसील तूं देव कां ॥
अनन्यगतिका जना निरखितांचि सोपद्रवा ।
तुझेंचि करुणार्णवा मन धरी उमोपेंद्रवा ॥ २० ॥
कळी कारि सुनिर्मळीं परमउग्र दावा नळीं ।
तयांत अविशुद्ध मी शलभ जेंवि दावानळीं ॥
*व्रणार्थ पशुच्या शिरावरि वनीं उभे कांकसे ।
स्मरादिरिपु मन्मनीं अहि न काळ भेका कसे ॥ २१ ॥
तरेन तुमच्या बळें भवमहानदीनाविका ।
तुम्हीच मग आतरास्तव मला सुदाना विका ॥
असे विदित वासही मज सदाश्रमींचा करा ।
दया गुण पहा सवें मज सदा श्रमीं चाकरा ॥ २२ ॥
धना परिजना घरीं तुमचिया उणें कायसें ।

(२०) १ दयामेघ. २ भक्तरूपी चातक. ३ कांहींएक. ४ भक्तास. ५ कंटाळशील. ६ आपणा वाचून ज्याला दुसरी गती नाहीं तो. ७ पिडलेले असे पाहतां. ८ दयेचा सागर, ९ फार दया.

(२१) १ कली. २ पवित्र ३ मोठा. ४ नळराजा ५ त्यावेळीं ६ अत्यंतअपवित्र सापडलो ७ टोळ ८ वणवा ९ जखमेनें पिडलेला *कीत्येक पुस्तकांत 'व्रणार्त' असाहि पाठ आहे. १० कावळे ११ कामादिशत्रु. १२ (सर्प) बेडकाला काळ कसे न होतिल ?

(२२) १ संसार २ मोठीनदी. ३ नावाड्या. ४ उतान्यास्तव. ५ सांगितलेलें. ३ (सत्+आश्रम) साधूजनांचें आश्रम. ७ सवय ८ कष्टकरण्याविषयीं.

(२३) १ सेवकांस. २ रत्नें, सोनें, व भूमिह्यांचा पालकह्यास ३ लोखंड. ४ साळ्यांस. ५ गुणानें कमीकिंवाजास्त न म्हणतां त्याचें आदरानें सेवन करतात.

न लाभ मणिहेमभूपतिस जोडिल्या आर्यसें ॥
परि प्रभुहि संग्रहीं सकलवस्तुला ठेविती ।
गुणा न म्हणतां उणा अधिक आदरें सेविती ॥२३॥
दिसे ह्मणुनि शाश्वतें प्रकृति रंक मी काय हो ।
प्रसन्न तुमचा वरें मजवरी प्रभो पाय हो ॥
क्षण त्यजुनि इंदिरांबृहदुरोजसंगा धरा ।
शिरीं पद मिळो सखा सम सुशील गंगाधरा ॥२४॥
प्रभुस्तुति न ठाउकी परि तिच्या महाकामुका ।
मला कृपण मारितो बहु सकाम हाका मुका ॥
ह्मणा मनिं असें कसें प्रथम नीट ये लेंकरा ।
हळू हळु पटु स्वयें सुपथिं लाविये लें करा ॥ २५ ॥
जनीं तरि असें असे शिशुहि जें मुखें वर्ण वी ।
पिता पिउनी तें भुले मधुरता सुखें वर्णवी ॥
मना जरि नये गुरूक्तहि ह्मणे कटु प्रायशा ।
दया-निधि तुह्मांपुढें जन-कथा अशा कायशा ॥२६॥

---

(२४) १ जन्मदरिद्री. २ तुच्छ मानलेला. ३ अहो. ४ समाधानयुक्त. ५ ईश्वरा. ६ होओत ७ ( इंदिरा + बृहत् + उरोज + संग ) लक्ष्मीच्या स्तनाच्या संगतीला. ८ सारखा. ९ सुस्वभावी-महादेवतो. १० महादेवा.

(२५) १ ईश्वराचें स्तवन. २ ठाऊक नाहीं. ३ प्रभुस्तवनाची. ४ (स्तुती) ज्याला आवडते अशा. ५ हिन. ६ स्तुति करण्याची इच्छा. ७ ज्याची वाचा भंग झाली आहे तो ८ यथायोग्य. ९ स्तुति करण्यास समर्थ. १० चांगला रस्ता. ११ लावलेलें.

(२६) १ बालकहि. २ तोंडानें. ३ अक्षरें. ४ बोले. ५ ऐकून. ६ गोडी. ७ वर्णन करीं. ८ चांगलें ह्मटलें असें ह्मणें. ९ कडू १० बहुधा. ११ थोड्याशा.

अतर्क्य[१] महिमा तुझा गुणहि फार बा[२] हे विधी[३] ।
श्रुतिज्ञहि[४] ह्मणे सदा[५] स्तविल आमुचा कवि[६] धी[७] ॥
तरी जन यथा मति स्तवुनि जाहले सन्मती[८] ॥
स्तवार्थ तुझिया तुझ्या सम कवी कधीं जन्मती ॥२७॥
निज-स्तुति तुह्मां रुचे[१] स्तविति त्या बरें तर्पितां[२] ।
नमस्कृतिपरां[३] बरें स्वधन सर्वही अर्पितां[४] ॥
स्वभाव तुमचा असा विदित[५] जाहला याचकां ।
करूं स्तव जसा-तसा[६] फळ नव्हे जना याच कां ।२८।
तुह्मी परम चांगले बहु समर्थ दाते[१] असें ।
सुदीन जन मी तुह्मां शरण आजि[२] आलों असें ॥
पुन्हांहि ह्मणतों बरें श्रवण हें करा यास्तवें[३] ।
समक्ष[४] किति आपुला सकल[५]लोकराया स्तव[६] ॥ २९ ॥
किती[१] श्रवण झांकिती प्रभुहि काय ते पोळती ।
पुसाल जरि कोणते पदरजीं[२] तुझ्या लोळती ॥
बरें तुजचि सोसवें स्तवून कृति[३]वासा गिरा[४] ।

(२७) १ तर्क करण्यास कठीण. २ हाका मारतो. ३ ब्रह्मदेव. ४ वेदार्थ जाणताहि. ५ तुझा महिमा कठीण असें ह्मणें. ६ कशी? ७ बुद्धि. ८ उत्तम बुद्धिचे,

(२८) १ आवडे. २ तृप्तकरितां ३ नमन करणाऱ्यास. ४ देतां ५ माहीत. ६ जसा येईल तसा.

(२९) १ तुह्मी मोठे समर्थ दाते आहां. २ ह्मणून मी तुह्मा आज शरण आलों आहे. ३ या साठीं ४ तुमच्या तोंडावर. ५ सर्व लोकांचा राजा जो तूं यासमोर. ६ स्तवन.

(३०) १ कित्येक, समर्थ स्तुतिपात्र असेंहि लोक, कोणि आपली स्तुति समक्ष करूं लागले असतां, जणु काय भजतात किंवा काय

नेपी तरि कसें घडे हित करा दयासागरा ॥ ३० ॥
गमो मधुर हें विषस्तवन सेवितां मार्जवी ।
करी मलिन सैद्यशोमुख हलाहलीं लाजवी ॥
हैरापरिस तूं वरा प्रभुवरा सदा जो पिशी ।
असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी ॥३१॥
कवीश्वरमनःपयोनिधिसुता स्तुतीच्या पते ।
भले न वरिती स्तुतिप्रति न जोडिती पाप ते ॥
गळां पडति ज्यांचिया तेंव गुणैकदेशभ्रमें ।
तिहीं तुजचि दाविता भजति वा तुला संभ्रमें ॥३२॥
ह्मणोनि कवितासुता तुज समर्पितों साजरी ।
नसे बहु तशी गुणी कनकपीतवासा जरी ॥
तरी न इतरा वरी हरि करीं इला किंकरी ॥
मयूर हि निजात्मजाग्रहविमुक्त जैसा करी ॥ ३३ ॥

---

ह्मणून आपले हात कानावर ठेवितात. २ तुमच्या पायाच्या धुळींत लोळतात. ३ महादेव. ४ विषाला. ५ जर महादेव विष न पिता तर लोकांची अवस्था कशी होती? ह्मणून भक्तां करितां (स्तवन रूप) हेंच कोणी एक विष तुह्माला सोसणें प्राप्त आहे.

(३१) १ मस्ती करणें. २ काळे. ३ चांगली कीर्ति हेंच मुख. ४ विषाला. ५ महादेवा पेक्षां तूं बरा कारण तो एकादांच विष प्याला आणि तूं नेहमी स्तुति रूप विष पितोस. ६ मोक्ष. ७ देतोस.

(३२) १ ( कवि+ईश्वर+मनःपयोनिधि+सुता+स्तुति ) मोठ्या कवींच्या चित्त समुद्रा पासून उत्पन्न झालेली जी स्तुति रूप लक्ष्मी तिच्या २ तुझ्या. ३ ( गुण+एक+देश+भ्रम ) गुणाच्या यत् किंचित् अंशा पासून झालेली भ्रांती तिनें ४ मोठ्या त्वरेनें.

श्री. से. केकावलि ०



स्मरोनि कृतमंतुला न कवितावधू स्वीकृती ॥
कराल तरि आयका प्रभु खराच मी दुष्कृती ॥
नमस्कृतिपुरःसर स्वकृति अर्पितों आजि ती ॥
दिली रविसखें तुह्मा जाशि नमोनि सात्राजिती ॥३४॥

पिता खळ परंतु ती गुणवती सती चांगली ॥
ह्मणोनि मज आपुल्या भजनिं लावणें लागली ॥
ह्मणाल तरि तत्सुता कशि तुह्मासवें भांडगा ॥
अहर्निशि हि भांडला त्रिनवरात्र जो दांडगा ॥३५॥

तिलाहि बरवी ह्मणा उचित होय तोषाकरें ॥
असेल सजली यथारुचि तर्यां स्वयोषा करें ॥
जशी पदरजें शिलापरि असे नव्हे शापिली ॥
धवें हरि मनोहरा कृतिसती अवें व्यापिली ॥ ३६॥

---

(३३) १ गोजीरवाणी, हित कारक. २ पितांबर. ३ चाकर. ४ (नि-ज+आत्मज+आग्रह+विमुक्त) आपल्या कवितारूप कन्येच्या आग्रहा पासून मुक्त.

(३४) १ केलेला अपराध. २ कवितारूप कन्येचा स्वीकार, ३ पापी ४ नमस्कार पूर्वक. ५ आपली कृति (कविता) ६ अर्पण करतो. ७ रविसारखा (सत्राजीत.) ८ सत्यभामा.

(३५) १ बाप दुष्ट (जांबुवान.) २ कन्या जांबुवंती. ३ (तत्+सुता) त्याची मुलगी जांबुवंती ४ भांडखोर. ५ रात्रंदिवस. ६ (त्रि+नव+रात्र) सत्तावीस दिवस.

(३६) १ जांबुवंतीस. २ (तोष+आकार) संतोषाची खाण. ३ आपली स्त्री ४ हस्त. ५ नवऱ्यानें. ६ (मनोहर+आकृति) सुंदर शरीर.

भले स्मरण जाहलें समायें कंस दासी करें ॥
कशी उजरली समुज्वल दया सुधासीकरें ॥
तुह्मां स्वरिपुची तशी बटिक आवडे मत्कृती ॥
नको न सजते असा बहुत काय मी दुष्कृती ॥३७॥
जशी पृथुक तंदुल प्रसृति आप्त कामा तशी ॥
रुचो कृति सभाग्य तूं सुनय आप्त का मातेशी ॥
कण्या विदुर मंदिरीं ह्मणति साधु आस्वादिल्या ॥
खरें जरि कशा तुज प्रभुसि आपुल्या स्वा दिल्या॥३८॥
जिणें रस पहावया प्रशिथिलीं रदीं चाविलीं॥
सुवास हि कळावया प्रथम नासिकीं लाविलीं ॥
तुह्मासि शबरी तशीं बदरिका फळें दे जुनीं ॥
कथा अशि असो पहा स्वचरितें तुह्मी मेजुनी ॥ ३९॥
प्रभो शरण आलियावरि नव्हां कधीं वांकडे ॥
ह्मणोनि इतुकेंचि हें स्वहित कृत्य जीवांकडे ॥
प्रसादं करितां नसे पळ विलंब बापा खरें ॥
घनांबु न पडे मुखीं उघडिल्या विना पांखरें ॥४०॥

---

(३७) १ कुब्जा. २ नीट केली. ३ फारच स्वच्छ. ४ दयारूप अमृताचे तुषार. ५ कंस. ६ ( मत्+कृति ) माझे स्तवन. ७ वाईट कृति.

(३८) १ पोहें. २ ओंजळ. ३ मनोरथ. ४ साधुजन. ५ फुगशील. ६ खाल्या. ७ स्वकीय.

(३९) १ चेपून मऊ-केली. २ दातानीं. ३ नाका जवळ. ४ बोरें.

(४०) १ होत नाहीं. २ शरण जाणे तें. ३ अनुग्रह. ४ अवकाश. ५ खरोखर. ६ पावसाच्या पाण्याचा थेंब. ७ उघडल्या वाचून ८ चातक पक्षी.

शिवे न तुझिया पदा अदयताख्यं दोष क्षण ॥
प्रभो चुकतसों तरी करिसि तूंचि संरक्षण ॥
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापि ती ॥
रुचे विषय ज्या मिळे अमृत ते न मद्या पिती ॥४१॥
विपाक न गणोनि म्यां प्रकट आपुल्या घातकें ॥
कळोनि अमितें बळें विविध जोडिलीं पातकें ॥
क्षमस्व भगवन्नजामिळसखोऽस्मि ऐसें तुला॥
ह्मणे नमुनियां सुदुस्तरविपन्नदीसेतुला ॥ ४२ ॥
नव्हे अनृत सत्य तें अचळ ऊचलीला करें ॥
तुवां हरिमदापहें बृहदुदारलीलाकरें ॥
समुद्धरसि एकटा जरि जडासि या कर्दमीं ॥
ह्मणेन भुवनत्रयीं तरि तुला भला मर्द मी ॥ ४३ ॥
चिकित्सक भला भला ह्मणुनि फार वाखाणिला ॥
जरी बहुजनामयद्रुम समूळही खाणिला ॥
तथापि अतिदुःसहस्वगदशत्रुच्या अत्ययीं ॥

---

(४१) १ निर्दयता या नांवाचा. २ शरणगत भाव. ३ मोक्ष. ४ सुरा

(४२) १ परिणाम. २ सोस. ३ ( भगवन्+अजामिल+सखः+ अस्मि) हे ईश्वरा मी अजामिलाचा मित्र आहे. (महापापि) ४ अपार दुःख नदी उतरण्याचा सेतु.

(४३) १ पर्वत. २ (हरि+मद+आप हें) इंद्राचा गर्व घालविणारा. ३ (बृहत्+उदार+लीला+करें) मोठी उदार लीला करणारा. ४ उद्धार करशील. ५ चिखलांत. ६ पराक्रमी.

४४) १ वैद्य. २ स्तविला. ३ (बहु+जन+आमय+द्रुम ) पुष्कळ लोकांचा रोगवृक्षतो. ४ सोसण्यास कठिण असा जो स्वरोग रुपी शत्रु त्याच्या ५ नाशावांचून. ६ रोगी. ७ अनुभवास.

विणा न हृदयीं धरी सरुज पामर प्रत्ययीं ॥ ४४ ॥
ह्मणा मज उताविळा गुणचि घेतला घाबरें ॥
असो मन असेंचि बा भजक-बर्हिमेघा बरें ॥
दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें ॥
धरील मन आधिनें बहु परिभ्रमे चाकसें ॥ ४५ ॥
कृतांतकटकामल-ध्वजजरा दिसों लागली ॥
पुरःसरगदासवें झगडतां तनू भागली ॥
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा ॥
न हों जरि उताविळा स्वरिपु कापितो हा गळा ॥ ४६ ॥
अवश्य करणें खरें प्रणतरक्षण स्वोचितें ॥
उशीर मग कां बसों कृपण मीहि कां शोचितें ॥
नव्हे प्रभुवरा तुह्मां उचित एकटें धावणें ॥
कृतांत शिवला नसे तंव दिसे बरें पावणें ॥ ४७ ॥
कसें तरि करूं तुझें अवन पूरवूं आळ जी ॥

---

(४५) १ उतावळेपणा माझा हा तुह्मीं गुणच घेतला; हा दोष नाहीं असें मी समजतो. २ भिणें. ३ (भजक+बर्हि+मेघा) भक्त हेच मोर त्यास आनंद देणाऱ्या मेघासारख्या. ४ नाशवंत. ५ हें जग. ६ मनोव्यथेनें. ७ फिरें. ८ चाकाप्रमाणें.

(४६) १ ह्मातारपणामुळें केंसाचा पांढरेपणा हा (यमाच्या सैन्याचा पांढरा ध्वज). २ पुढारी रोगाबरोबर. ३ शरीर. ४ अधिक ५ मृत्यु.

(४७) १ नम्रजनांचे संरक्षण. २ आपणांस योग्य. ३ रडत. ४ योग्य. ५ यम. ६ रक्षण करणारें.

(४८) १ रक्षण. २ आवडत्या. ३ (तत्+आश्रित+मृग) त्या अरण्यवासी हरिणास. ४ सुखाचा वाटा.

असेल मनिं आमुची तुज कशास रे काळजी ॥
असें ह्मणि ह्मणाल हो प्रियतमा जगज्जीवना ॥
तदाश्रितमृगांसि[3] ती सुखसमृद्धि वा जी वना ॥ ४८ ॥
सुखेंचि सुख बाळका प्रकट होय मातेचिया ॥
तिला घडति जे श्रम प्रियजनोत्तमा[1] तेंचि या[2] ॥
ह्मणोनि[3] न शिवो पळ क्षणहि कष्ट जीवा[4] तुला ॥
विपज्जलधिसेतुला[5] सकळलोकजीवातुला[6] ॥ ४९ ॥
असोत तुज आमुचीं सकळ भाविकायुर्बळें[1] ॥
जगोनि बहु काय म्यां सुकृत जोडिलें दुर्बळें[2] ॥
असें प्रियतमा सुखी बहुतकाळ मायांतमीं[3] ॥
जना सुपंथ[4] दाखवीं मुदितें[5] सत्तमा[6] यात मीं[7] ॥५०॥
भलें परिशिलें सुरासुरनरीं तसें लक्ष मीं ॥
ह्मणोत ह्मणणार वा तुज असा नसेल क्षमी[1] ॥
उरीं भृगुपदाहती[2] मिरवितोसि[3] अद्यापिती ॥

(४९) १ ( प्रियजन + उत्तम ) प्रियसखा. २ या बालका. ३ आई-च्या सुखदुःखाप्रमाणें मुलांस सुख दुःख असतें ह्मणून. ४ प्राण धारण करणारा जो तूं अशा त्या तुला. ५ ( विपद् + जलधि + सेतु ) विपत्तिरूप समुद्राच्या सेतूला. ६ सर्व लोकांचें जीवन.

(५०) १ निष्ठावंत आयुष्यबळें. २ दुबळा. ३ मोहरूपी अंधारांत. ४ लोकांस चांगला रस्ता दाखविला. ५ आनंदित. ६ श्रेष्ठांस. ७ तुझ्या सन्मानदर्शक कर्मांत.

(५१) १ सोसीक. २ ( भृगु + पद + आहती ) भृगुऋषीच्या पाया-चें ताडन. ३ फिरवितोस. ४ तुमचे यश दर्शविणारी कथा. ५ नवी अमृतरूप व निर्दोषी अशी.

कवी तव यशःकथा नवसुधानवद्या पिती ॥ ५१ ॥
भवन्मतिस आवडे जरि घनादिकालागि ते ॥
मदीय गुणकीर्तनश्रवण कां तरी त्यागिते ॥
असेंहि ह्मणशील बा जरि तरी तुझी मावली ॥
तुज त्यजुनि पार्जितां कशि दुधाकडे धांवली ॥५२॥
अनावर पिशाचिका विषयवासना सत्य जी ॥
असें करवि कृत्य जी भुलविते कधीं न त्यजी ॥
म्हणोनि तुज जाणत्या विनवितों इला काढ गा ॥
करीन मग तूं जरी ह्मणसि आपणा गाढ गा ॥५३॥
तुझ्या गुणकथा महासुरभि त्यांत हीं रासभी ॥
शिरे विषयवासना जाशि शुका अहीरास भी ॥
तशी न इतरास भी इस सदंडही हाकिती ॥
तथापी बहु लाथळी मग अदंड मी हा किती ॥५४॥
खरासुर जसा तशी विषयवासना हे खरी ॥
हिचा वध करावया तुजचि शक्ति आहे खरी ॥
बकी सुमति ताटका लघु न हे भली लाजशी ॥

(५२) १ (भवत्+मति) तुमच्या बुद्धिस. २ भक्त. ३ आई. ४ स्तनपान करतां.

(५३) १ आवरण्यास कठिण. २ डंकिण. ३ ऐहिक भोग्य पदार्थाची इच्छा. ४ निविध. गा ह्म० गाणें, गाढ हे क्रि० वि०

(५४) १ मोठी कामधेनु. २ विषय वासरा. ३ गाढवी. ४ कुंभारास ५ भितें. ६ काठीनें. ७ लाथा मारतें. ८ दंड रहित, पंचेंद्रि जिंकित नाहीं असा संसारी.

(५५) १ गाढवी. २ खरोखर. ३ पूतना. ४ नांवाची राक्षसीण. ५ गोकुळांत. ६ किर्ती, विलास.

उगाचि ताशी एक ही व्रजवनांत[5] लीला[6] जशी ॥५५॥
कसेंतरि असो मग स्वपणरक्षणाकारणें ॥
अवश्यशरणागतव्यसन तों स्वयें[1] वारणें[2] ॥
तुह्मां विहितें[3] मुख्य हें न पुसतां करा हो खरी ॥
निजोक्ति[4] खरें[5] काय तो अधिक संहरा[6] हो खरी[7] ॥५६॥
खरी[1] करितसे कशी तव जनींहि सत्ता[2] पहा ॥
इचा[3] वध न निंद्य बा प्रबळमूर्तसत्तापहा[4] ॥
कथासुरभिचा रस स्वहित पुष्कळ स्वादुही[5] ॥
ह्मणे त्यजुनि कां मला निजधना परस्वा[6] दुही[7] ॥५७॥
कथासुरभि[1] या भल्या स्वजननींहुनी वाटती ॥
शिशूंसि[2] जरठांसही[3] निरखितां रसें दाटती[4] ॥
दुहोतें[5] भलते[6] सदा तरि न लेशही आटती ॥
स्ववत्समल[7] भक्षिती परि न सर्वथा वाटती ॥ ५८ ॥
कथांसि उपमा दिली सुरभिची दिसे नीट ती ॥
परंतु बहु मंद[1] मी ह्मणुनि सच्छ्रुती[2] वीटती ॥
कथा निरुपमा तयांप्रति पशूपमा[3] शुद्ध तें ॥

---

(५६) १ स्वतः २ निवारणें. ३ योग्य. ४ (निज+उक्ति) आपली वाणी. ५ गाढव. ६ संहार करणें. ७ गाढवी.

(५७) १ गाढवी; खरी करणें. २ अधिकार. ३ हनन. ४ साधूंचा संताप. ५ गोडीहि. ६ परकीय वस्तू. ७ दूध काढी.

(५८) १ कथारूपी कामधेनू. २ मुलास सुद्धां. ३ म्हाताऱ्यासहि. ४ त्यास पान्हा फुटतो. ५ दोहन करोत. ६ कोणी तरी. ७ आपल्या वत्साचा ( भक्ताचा ) जो पापरूपी मळ तो.

(५९) १ आळशी. २ (सत्+श्रुति) उत्तम वेद. ३ (पशु+उपमा) पशूंची उपमा. ४ उद्धटपणानें.

नव्हेचि न विचारिलें बुधजनांसि म्यां उद्धतें ॥५९॥
असेंहि उपदेशिती गुरु रहस्य मंदा रुचे ॥
निजस्तव जसा तसा अगुण घे न वंदारुचे ॥
म्हणोनि निगमस्तुता भलतसें तुला वानितों ॥
परंतु हृदयीं महाजनभयास मीं मानितों ॥ ६० ॥
ह्मणें स्वकृतिच्या उणें किमपि एक वर्णीं न हो ॥
असें तुज कधीं बरें विगतशंक वर्णी न हो ॥
असोचि अशि आवडी करिशि कां न अत्यादर ॥
स्वभक्तसुरपादपा हरि नसोचि सत्यां दर ॥ ६१ ॥
ध्रुव स्तवनिं आवडी धरि ह्मणोनि अत्यादरें ॥
तुह्मीं करुनि दाविली शिवुनि गल्ले सत्या दरें ॥
तसें मज करा करांबुज धरा शिरीं मावरा ॥
वराभयपरा पराक्रमपटो मना आवरा ॥ ६२ ॥
करांबुज असो नसे उचित त्यास मी पामर ॥
प्रणाम करिती पदाप्रतिहि सन्मुनी सामर ॥
पदाब्जरज ही जगत्त्रयनमस्क्रियाभाजन ॥
प्रसाद चतुरा कसा तरि करा बरा हा जन ॥ ६३ ॥

---

(६०) १ यथार्थ ज्ञान. २ मुर्खाला. ३ आवडे. ४ जसा करील तसा. ५ दोष घेत नाहीं. ६ वंदन करणाराचें. ७ वेदस्तुत. ८ म[नां]त येईल तसे. ९ स्तवितों.

(६१) १ अक्षरीं. २ ज्याची शंका गेली आहे तो. ३ वर्णन करी[न]. ४ आदर सत्कार. ५ खऱ्यास. ६ डर; भिती.

(६२) १ उत्तान पात राज्याच्या नावडत्या बायकोचा मुलगा. २ ग[ळ]ल. ३ शंखानें. ४ हातांत कमळ धरणाऱ्या. ५ हे लक्ष्मी प[ते]

(६३) १ दीन. २ देवासहित. ३ पात्र.

तुह्मीं करुनि दाविला ध्रुव[1] कृतार्थ[2] जैसा दरें[3] ॥
तसाचि जरि योजिलें तुमचियां मनें सादरें[4] ॥
असो विहित[5] तें करा परि बरोबरी त्यासवें ॥
नसे उचित तो महाप्रबळ वंदिजे[6] वासवें[7] ॥ ६४ ॥
किती वय कसें तप प्रखर[1] काय विश्वासे[2] तो ॥
ध्रुव ध्रुव खरा स्तवा उचित होय विश्वास तो ॥
कशी तुळितसां[3] तुह्मीं प्रकट मेरुशीं[4] मोहरी[5] ॥
प्रसाद करितां उणें अधिक नाठवा[6] हो हरी ॥६५॥
प्रभुत्व[1] तरि हेंच कीं करुनि दे कृपा दान तें ॥
स्वसाम्य[2] यदुपार्जनें[3] मिरविजे स्वपादानतें ॥
प्रसाद मग काय तो जरि निवारिना लाघवा ॥
कसें दशमुखानुजा[4] विसरलां अहो राघवा[5] ॥ ६६ ॥
असो हरि कसा तरी विमल[1] भाव ज्याचा करा ॥
तयावरि दया पचे वर असाचि द्या चाकरा ॥
वृथाचि[2] गमतें दिलें बहुहि जें न दासा जिरे ॥
पुसोनि अधिकार द्या सुकर[3] तें सदा सांजिरें[4] ॥६७॥

---

(६४) १ नाम विशेष. २ मनोरथ सिद्ध. ३ शंखानें. ४ दया युक्त अशा. ५ योग्य. ६ वंद्य होय. ७ इंद्रानें.

(६५) १ कडक. २ एक निष्ट भाव. ३ तोलून पाहतां. ४ मेरू बरोबर. ५ राई. ६ आठवत नाहींस.

(६६) १ श्रेष्ठत्व. २ आपली बरोबरी. ३ (यत्+उपार्जन) ज्याप्राप्तीनें. ४ बिभीषण. ५ हे ईश्वरा (रामा.)

(६७) १ निर्दोषी. २ व्यर्थचि. ३ करण्यास सोईवार. ४ चांगलें हितकारक.

प्रसन्न बहु होतसां परि कराल हो बावरें ॥
शिवापरि वरांसवें हृदय हें न हो बावरें ॥
असा वृक कृतघ्न हें न कळलें कसें हो हरा ॥
भला जगविला तुह्मीं भवमहाहिचा मोहरा ॥ ६८ ॥
भजे सुदृढनिश्चयें द्विजकुमारक क्षीरेंधी ॥
तया करिं तुह्मींच द्या मदनमारक क्षीरेंधी ॥
उदारपण तें बरें सुखवि जे सुपात्रां सदा ॥
दिलें अमृत पन्नगां तशि खळीं कृपा त्रासदा ॥६९॥
अतिप्रिय सुखप्रद प्रथम तूं मुदंभोद या ॥
मयूरहृदया तुझी क्षण विटो न शंभो दया ॥
उदारपण वानिलें अजि गुरूपहासा बळें ॥
कसें करिल लेंकरूं निपट हें पहा साबळें ॥ ७० ॥
तुह्मां हरिहरांत ज्यां दिसतसें दिसो वास्तव ॥
प्रबुद्ध ह्मणती नसे तिळही भेद मी यास्तव ॥
ह्मणे मनिं यथार्थ जें स्वमतें वर्णिती शैव तें ॥

---

(६८) १ वेडें. २ वरा बरोबर. ३ लांडगा (एका असुराचे नांव.) ४ शिवाला. ५ संसाररूपी मोठ्या सर्पाच्या मस्तकांतील विषाचा प्रति बंध करणारा मणि.

(६९) १ बळकट. २ उपमन्यु. ३ दूध इच्छिणाऱ्या. ४ काम नाशक. ५ दूधाचा समुद्र. ६ योग्य. ७ सर्प ८ त्रासदायक.

(७०) १ सुख दायक. २ (मुत्+अंभोदय) आनंद दायक मेघ जो तूं. ३ मोरोपंताचे हृदय. ४ स्तविलें. ५ (गुरू+उपहास) मोठ्या लोकांनीं केलेल्या विनोदांत. ६ अगदीं ७भोळें; बावळें.

(७१) १ ज्याला. २ ज्ञानीं. ३ सत्य तथ्य. ४ आपले रूप मन ते. ५ शिवोपासक. ६ द्वैतवादी.

न वैष्णव दुराग्रही परम मुख्य ही दैवतें ॥ ७१ ॥
ह्मणे क्षण पुरांतक क्षण मुरांतक ब्राह्मणा ॥
मला जरि ह्मणाल वा तरि विशंक लुब्रों ह्मणा ॥
तुह्मां शिव शिवा तुह्मी भजतसां शुक व्यास हा ॥
सदर्थ वदले पुरातन कथा न नव्या सहा ॥ ७२ ॥
तुझाचि अवतार तो सुत पराशराचा वळें ॥
तदुक्तिस जन प्रभो जरि निजे मध्यें चावळे ॥
तरी त्रिभुवनेश्वरा तव विशुद्ध नामावली ॥
मुखी प्रकट होय जी करि सुखी जना मावली ॥७३॥
तुझें कुशल नाम जो नर हळु हळू आकळी ॥
दुरत्यय असा महाखळहि त्यांस भी हा कळी ॥
हरी व्यसन पाप हें बहु कशास कायाधवा ॥
परी त्वरित भेटवी तुजहि योगमायाधवा ॥ ७४ ॥
तुह्मांसमचि हें गुणें अणु उणें नसे नाम हा ॥
दिसे अधिकही तसा गुण तुला असेना महा ॥

---

(७२) १ वाचाळ. २ (सत् + अर्थ.) खरा अर्थ ३ पूर्वीचा.

(७३) १ पहिल्या बाणाचा. २ (तत् + उक्ति) तुमचे बोलणें. ३ बडबडे ४ (त्रि + भुवन + ईश्वर) तीन भुवनांचा ईश्वर. ५ शुद्ध. ६ (नाम + आपली ) नांवाची पंक्ति. ७ आई.

(७४) १ मनुष्य. २ आकलन करीं. ३ पार पडल्यास परम कठिण. ४ महादुष्ट. ५ तुझें नांवास. ६ भितो. ७ कलियुग. ८ कयाधूचा पुत्र प्रऱ्हाद. ९ संलग्न मायेचा धनी जो तूं त्याला.

(७५) १ रजःकण. २ अनाधिकाऱ्यसहि. ३ सोपें. ४ नाम गाणाऱ्यास. ५ विष्णुनें वामन अवतारीं बळीशीं कपट केलें व त्यास अधोगति दिली ह्म० पाताळीं घातलें.

सदैव भलत्यासही सुलभ आणखी गायका ॥
छळी न न अधोगति क्षणहि दे जगन्नायका ॥७५॥
छळीं नृप बळी बेळी तरिच तो नसे आटला ॥
गमे बहु भला मला न सकळांस ही वाटला ॥
परीक्षिक करीतसें जडहि सोशीते हे मही ॥
न केवळ विरोचनांत्मज तरे पदें हे मही ॥ ७६ ॥
असा न करिता जरीं छळ तरी प्रभो तो भली ॥
सुकीर्ति कशि पावता कविसभा जिणें शोभली ॥
पदी उपजती नदी काशि कशी त्रिलोकी सती ॥
अशा अतुल मौक्तिकावलिविणें बरी दीसती ॥ ७७ ॥
नको छळ अधीर मी तशि न कीर्ति हो चामरें ॥
नृपासि उचिंतें वृथा मिरविलीं जरी पामरें ॥
अकीर्तिच असो रुचे तुज कशी ब्रजीं कांवळी ॥
असें न समजां कसें वरिल हारिला कां बळी ॥७८॥
छळाल कृपणासि कां अजि दयानिधे कापिती ॥
भटासि भटे संगरीं मरि न कातरा दापिती ॥

---

(७६) १ बळकट. २ नाम विशेष बळीराजा, (विरोचन पुत्र). ३ कमी झाला. ४वाटे. ५शाहणा. ६ सोनार, लोहार. ७जड पदार्थ लोह ईत्यादि. ८ प्राशन करितें. ९ पृथ्वी. १० (विरोचन+आत्म+ज) बळीराजा.

(७७) १ पक्षी. २ उत्पन्न होती. ३ कांचणी ४ पतिव्रता ५ ज्याची तुलना नांहीं ते. ६ मोत्याच्या कंठी शिवाय.

(७८) १ चवऱ्या. २ व्यर्थ. ३ फिरविली. ४ दरिद्यानें. ५ गोकुळांत ६ जिंकिला. ७ बळीराजा.

कराल तितुकी कृपा बहु अहो शरण्यां तमीं ॥
बुडोनि शरणागत श्रमतसें अरण्यांत मी ॥ ७९ ॥

मुखासि जंव पातलीं श्रम अरण्य ऐशीं पदें ॥
निजस्मृतिस जाहलीं विषय तीं तव श्रीपदें ॥
गुरूक्तिस करावया सफल जानकीजीवना ॥
धरासुरतपःफळें त्वरित धांवलीं जीं वना ॥ ८० ॥

तेयीं प्रभुवरा तसे सदय कां असे आज हो ॥
विचारुनि पहा बरें निजमनीं महाराज हो ॥
वनोवनिं फिरा पिशापरि ह्मणां अहोरात्र हा ॥
नसे कुशल भाषणीं परि असे कृपापात्र हा ॥ ८१ ॥

समागम तुझा घडो ह्मणूनि जाहले लांकडें ॥
तपोनिधि तसे मुनि त्यजुनि जोडिलीं माकडें ॥
अयुक्त बहु ज्या जनीं स्तव घडे पडे सांकडें ॥
तदुक्तिहुनि आमुचें बहुत बोलणें वांकडें ॥ ८२ ॥

जगत्त्रयमनोहरा बलगुणैकरत्नाकरा ॥

---

(७९) १ आज. २ योद्धे. ३ युद्धांत. ४ भिञ्याला. ५ दाखिती. ६ निर्भय स्थान रक्षण करणाऱ्या. ७ अज्ञानांधारांत. ८ दुःख पावतसें. ९ संसाररूपीं अरण्यांत.

(८०) १ आपली आठवण. २ विषय भूत जाहली. ३ चांगलें ह्मणण्यास. ४ अजि.

(८१) १ राम अवतारीं सीता रावणानें नेली असता ती विषयीं. २ तसे निर्दय. ३ हायहाय. ४ कल्याण. ५ मोरोपंत.

(८२) १ त्याग करून. २ अयोग्य. ३ ज्या माकडांसाठीं. ४ संकट. ५ त्याचे भाषण.

सदैव भलत्यासही सुलभ आणखी गायका ॥
छळी न न अधोगति क्षणहि दे जगन्नायका ॥७५॥
छळीं नृप बळी बळी तरिच तो नसे आटला ॥
गमे बहु भला मला न सकळांस ही वाटला ॥
परीक्षक करीतसे जडहि सोशीते हे मही ॥
न केवळ विरोचनात्मज तरे पदें हे मही ॥ ७६ ॥
असा न करिता जरीं छळ तरी प्रभो तो भली ॥
सुकीर्ति कशि पावता कविसभा जिणें शोभली ॥
पदी उपजती नदी कशि कशी त्रिलोकी सती ॥
अशा अतुल मौक्तिकावलिविणें बरी दीसती ॥ ७७ ॥
नको छळ अधीर मी तशि न कीर्ति हो चामरें ॥
नृपासि उचितें वृथा मिरविलीं जरी पामरें ॥
अकीर्तिच असो रुचे तुज कशी व्रजीं कांबळी ॥
असें न समजां कसें वरिल हारिली कां बळी ॥७८॥
छळाल कृपणासि कां अजि दयानिधे कांपिती ॥
भटासि भटे संगरीं मरि न कातरा दापिती ॥

---

(७६) १ बळकट. २ नाम विशेष बळीराजा, (विरोचन पुत्र). ३ कमी झाला. ४वाटे. ५शाहणा. ६ सोनार, लोहार. ७जड पदार्थ लोह ईत्यादि. ८ प्राशन करितें. ९ पृथ्वी. १० (विरोचन+आत्म+ज) बळीराजा.

(७७) १ पक्षी. २ उत्पन्न होती. ३ कांचणी ४ पतिव्रता ५ ज्याची तुलना नाहीं ते. ६ मोत्याच्या कंठी शिवाय.

(७८) १ चवऱ्या. २ व्यर्थ. ३ फिरविली. ४ दरिद्यानें. ५ गोकुळांत ६ जिंकिला. ७ बळीराजा.

कराल तितुकी कृपा बहु अहो [6]शरण्यां [7]तमीं ॥
बुडोनि शरणागत [8]श्रमतसें [9]अरण्यांत मी ॥ ७९ ॥
मुखासि जंव पातलीं श्रम अरण्य ऐशीं पदें ॥
[1]निजस्मृतिस जाहलीं [2]विषय तीं तव श्रीपदें ॥
[3]गुरूक्तिस करावया सफल जानकीजीवना ॥
धरासुरतपःफळें त्वरित धांवलीं जीं [4]वेना ॥ ८० ॥
[1]तेथीं प्रभुवरा तसे सदय कां [2]असे आज हो ॥
विचारुनि पहा बरें निजमनीं महाराज हो ॥
वनोवनिं फिरा पिशापरि ह्मणां अहोरात्र [3]हा ॥
नसे [4]कुशल भाषणीं परि असे कृपापात्र [5]हा ॥ ८१ ॥
समागम तुझा घडो ह्मणुनि जाहले लांकडें ॥
तपोनिधि तसे मुनि [1]त्यजुनि जोडिलीं माकडें ॥
[2]अयुक्त बहु ज्या [3]जनांस्तव घडे पडे [4]सांकडें ॥
[5]तदुक्तिहुनि आमुचें बहुत बोलणें वांकडें ॥ ८२ ॥
जगत्त्रयमनो[1]हरा बलगुणैकरत्ना[2]करा ॥

---

(७९) १ आज. २ योद्धे. ३ युद्धांत. ४ मित्र्याला. ५ दाविती. ६ निर्भय स्थान रक्षण करणाऱ्या. ७ अज्ञानांधारांत. ८ दुःख पावतसें. ९ संसाररूपी अरण्यांत.

(८०) १ आपली आठवण. २ विषय भूत जाहली. ३ चांगलें ह्मणण्यास. ४ अजि.

(८१) १ राम अवतारीं सीता रावणानें नेली असता ती विषयीं. २ तसे निर्दय. ३ हायहाय. ४ कल्याण. ५ मोरोपंत.

(८२) १ त्याग करून. २ अयोग्य. ३ ज्या माकडांसाठीं. ४ संकट. ५ त्याचे भाषण.

ह्मणे कनकरंकु द्या मज महाप्रयत्ना करा ॥
प्रिया हि आशि जाहली तुज कुकार्य आज्ञापिती ॥
सुधा त्यजुनि कामुक प्रकट अंगनाज्ञा पिती ॥ ८३ ॥
स्वदास समयीं जपे तरि न देवरा चाकरी ॥
चुके न पारि सार्थकें श्रम न देवराचा करी ॥
वदोहि भलतेंचि ते तिसचि कोप टाका पुसा ॥
असें मृदु ह्मणोनि बा मज न घोपटा कापुसा ॥ ८४॥
न जें प्रिय सदोष ते प्रिय सदोपही चांगलें ॥
स्वतोक पितरां रुचे जरि हि कर्दमीं रांगलें ॥
तुलाचि धरि पोटिशीं कशि तदा यशोदा बरें ॥
जरीं मळविशी रजोमलिनकाय तूं अंबरें ॥ ८५ ॥
तुझे कथिती गोपिका विविध तीस बोभाट ते ॥
सुखप्रद गुणस्तवापरिस जाहले वाटते ॥
क्षमा न करि एकदां तरि हि फार खोडी करां ॥
न देचि भय ताडनोद्यमसमेत सोडी करां ॥ ८६ ॥
जरी ह्मणसि बांधिलें तरि न कष्टवीलें केरा ॥

(८३) १ सुंदरा. २ समुद्र. ३ सुवर्ण हरिण. ४ अमृत. ५ कामी.

(८४) १ हनुमंत. २ सफल. ३ दिराचा (लक्ष्मणाचा). ४ हळू. ५ मारा. ६ विचारतां कां ?

(८५) १ आपले बालक. २ चिखलांत. ३ धुळीनें मळलें आहे शरीर ज्याचें. ४ वस्त्रें.

(८६) १ गोपाळांच्या बायका. २ नाना प्रकारच्या. ३ यशोदेस. ४ कागाळया. ५ ताडणरूपी उद्योगा बरोबर. ६ हाताला.

(८७) १ श्रमविलें. २ हाताला. ३ यथा योग्य; पाहिजे तितकें. ४ दावें. ५ अतिशय.

विचार जशि कष्टवां तशि न कष्टवी लेंकरा ॥
यथेष्ट[3] पुरतें जरी प्रथम दाम[4] कां सांधिती ॥
न ती प्रबळ[5] गोपिका तुज तुझी दया बांधिती ॥८७॥
तुह्मींहि बळि[1] बांधिला[2] ह्मणुनि आमुची माय जी[3] ॥
मनांत सहजा[4] दया निपट[5] टाकिली कायजी ॥
सकोप दिसती गुरु क्षणभरीच जें तापलें ॥
जल ज्वलनसंगमें[6] त्यजि[7] न शैत्य[8] तें आपलें ॥८८ ॥
प्रसिद्ध तुमचे महा सदय पाय जीवांकडे ॥
चुकी ह्मणुनि होतिल क्षणहि काय जी वांकडे ॥
न निष्ठुर[1] पिता ह्मणे मनिं न हो प्रजा टोणपी ॥
आपथ्यरुचिरुग्ण[2] तो कटुक ओखदें कोण पी ॥८९॥
असंख्य खळ संगरीं[1] निजकरीं[2] तुवां मारिले ॥
न निष्ठुरपणें कृपा करुनि ते भवीं[3] तारिले ॥
जगज्जनक तूं मुलें सकळ जीव यां भातुकें[4] ॥
दटावुनि हि देशि बा अमृत[5] नेदिजे घातुकें[6] ॥ ९० ॥
वरि प्रकट शांतिला धरि परंतु मीना बकी[1] ॥
गिळी तशि तुला टपे सुकृतबुद्धिहीना बकी[2] ॥
जिणें[3] गरळ[4] पाजिलें अमृत[5] पाजिलें तीस तें ॥
खळासि न दिसो भलें पण खरें भल्या दीसतें ॥९१॥

---

(८८) १ विरोचन पुत्र. २ बंधन केलें. ३ अजि. ४ समजा. ५ केवळ. ६ अग्नि संयोग. ७ टाकी. ८ शीतपण.
(८९) १ निर्दय. २ रोगी.
(९०) १ युद्धांत. २ आपल्या हातीं. ३ संसारांत. ४ खाऊं. ५ मोक्ष. ६ नाश करणाऱ्यानें.
(९१) १ वगळी. २ पुतना. ३ ताटिका. ४ विष. ५ दूध.

सदाहि हित[1] नायकों बहु अपाय केले करूं ॥
तरी सकृप बाप तूं ह्मणासि नायके लेकरूं ॥
कधीं न करिसि प्रभो भजकबा[2]ळकोपेक्षण ॥
न तूजवरि ज्यापरी पशुपपा[3]ळ कोपे क्षण ॥ ९२ ॥
खरा जनक[1] तूं जना इतर कोण हो दे[2]वी ॥
स[3]मीहित फळें जगा तव पदाब्ज दे देववी ॥
अशीच करु[4]णा असो हरि कधीं न भंगो[5] पिता ॥
अशा मज असाधुला इतर कोण संगोपिता[6] ॥ ९३ ॥
सुविद्य[1] धन मेळवी वचन आयके आवे[2]री ॥
प्र[3]पंचभर घे शिरीं करि कृपा पिता त्यावरी ॥
असा जरि नसे रुचे तरि न तो अभ[4]द्र क्षण ॥
तसा तुजाचि आवडे करिसि तूंचि तद्रक्ष[5]ण ॥ ९४ ॥
पिता जरि विटे[1] विटो न जननी कुपुत्रीं विटे ॥
दयामृतर[2]सार्द्रधी न कुलक[3]ज्जलें त्या किटे[4] ॥
प्र[5]सादपट झांकिती परि प[6]रा गुरुचे थिटे[7] ॥

---

(९२) १ कल्याण. २ (भजक + बालक + उपेक्षण) भक्त रूपी लें-
कराची उपेक्षा. ३ गवळ्यांचा नायक (नंद).

(९३) १ पिता. २ प्रसवी. ३ इच्छित. ४ दया. ५ नाश पावो.
६ रक्षण कर्ता.

(९४) १ चांगला विद्वान. २ आटोपी. ३ संसाराचा भार. ४ करंटा.
५(तत् + रक्षण) त्यांचे संरक्षण.

(९५) १ कंटाळला. २ दयारूपी अमृतानें जिचें अंतःकरण ओलें झालें
आहे अशी. ३ कुलाला कलंक लावणारा जो पुत्र त्याच्या
योगानें. ४ मळत नाहीं, ह्म० तिची त्याच्यावरची ममता कमी
होत नाहीं. ५ प्रसादरूप वस्त्रें. ६ श्रेष्ठ बापाचे. ७ आखूड ;
लहान. ८ कर्ज. ९ आईचें.

ह्मणूनि ह्मणती भले न ऋण जन्मदेचें फिटे ॥ ९५ ॥
विटेल जननीहि कीं शत रचो निमित्तें विधी ॥
मळे कलि युगीं श्रुती जशि खळीं तिची तेविं धी ॥
कदाचित विटेल बा तव दया न दीनावरी ॥
जशी जगदघक्षयीं कर भवन्नदी नावरी ॥ ९६ ॥
कृपाचि जननी तुझी सकल जीव दायाद या ॥
तिणेंचि उपदेशिल्या करिति सर्व दायो दया ॥
असें उमजतां भले न गुरु भाव तो टाकिती ॥
मता तुजहि गोपिका मग जनास तोटा किती ॥ ९७ ॥
भरोनि कुचकुंभ जी विषरसें मुखी दे बकी ॥
प्रभो तिसहि ठेविशी जशि महा सुखीं देवकी ॥
न होति जनना कशा पशुपदार गाई लया ॥
न पावतिल तत्सुखें कृति न कोण गाइल या ॥ ९८ ॥
अशी तरि कृतज्ञता हरि तुझ्याच ठायीं अगा ॥
सख्या अणुचि मानिशी करुनि सुप्रसादा अगा ॥
भुले सुकविवाग्वधू तव गुणा अनर्घ्यो नगा ॥

(९६) १ रचना करतो. २ नशित. ३ मति. ४ जगाच्या पाप नाशार्थ. ५ भागिरथी.

(९७) १ आई. २ उपमाता. ३ समजता. ४ श्रेष्ठत्व. ५ मान्य. ६ गोपिका.

(९८) १ मोटे स्तन. २ विषाचे. ३ पुतना. ४ देवकी ५ गोपीका. ६ मोक्ष.

(९९) १ प्रत्युपकार बुद्धि. २ अत्यल्प. ३ उत्तम प्रसादरूप पर्वत. ४ चांगल्या कवींची वाणी हीच कन्या. ५ अतुल्य. ६ दागिन्यानां. ७ नको गाऊं.

ह्मणेल जन कोण कीं यश पुनः पुन्हां तें न गा॥९९॥
तुह्मीं बहु भले मला उमज होय ऐसें कथा ॥
कसा रसिक तो पुन्हा जरि ह्मणेल आली कथा ॥
प्रतिक्षण नवीच दे रुचि शुकाहि संन्यासिया ॥
न मोहिति भवत्कथा अरसिका अभ्यासिया॥१००
कथा श्रवणचत्वरीं जरि पुनःपुन्हा ये रते ॥
महारसिक तद्रसीं विटति ऐकतां येरे ते ॥
विलोकुनि विलासिनीजन पुनःपुन्हा कामुका ॥
करी वश नव्हे बुळा विवश घेइना का मुका॥१०१॥
कथा सुपुरुषा तुझी वश तशी करी राधिका ॥
जशी तुज जिला स्वयें ह्मणासि तूं शरीराधिका ॥
तिचें न घडतां रमाहृदयवल्लभा सेवन ॥
प्रभो तुज जसें तसें मतिस गेहें भासे वन ॥१०२॥
कथा भुवनमोहिनी अशि न मोहिनी होय ती ॥
हरी असुरधी हिणें भुलविले किती हो यती ॥
नव्हे न ह्मणवे असो जरि विमोहिलें दक्षहा ॥
प्रिया बसविली शिरीं मुनिपथीं कसा दक्ष हा॥१०३॥
सुरासुर नरोरगा भुलवुनी कथा न त्यजी ॥

(१००) १ समजपडे. २. सांगा. ३. रसज्ञ. ४. गोष्ट. ५ वश करिते.
(१०१) १ कर्णरूप अंगणांत. २ इतर. ३ पाहून. ४ कामी. ५ षंढ.
(१०२) १ स्वतां. २ प्रिया. ३ बुद्धि. ४ घर. ५ अरण्य भासे.
(१०३) १ (विष्णुचे रूप) मोह पाडणारी एक स्त्री. २ राक्षसांचीबुद्धि ३ संन्यासी. ४ भुलविला. ५ महादेव. ६ हुशार. ७ हा महादेव.

न भेद करि पंक्तिचा अमृत पाजिती सत्य जी ॥
तिणें जरि सुधारस स्वरतमानसा पाजिला ॥
वधी अमृत घोटितां द्रेव नयेचि बापा जिला ॥ १०४ ॥
आभिष्ट वरितात जे तव कथेस विश्वासती ॥
भली असुरवंचनीं श्रुत असेचि विश्वास ती ॥
कथा कशि सखी तिची ठकवुनी हरी संचितें ॥
तरी अमृत दे असें सदय दाखवी वंचितें ॥ १०५ ॥
करा श्रवण येवढें अपटु लोक हांसो मला ॥
अहो जरि गिळावया प्रियकुमार घे सोमला ॥
तयासि ठकवूनि दे बहुत शर्करा माय जी ॥
तिला स्वशिशुवंचनें अदयता शिवे काय जी ॥ १०६ ॥
ह्मणोनि बहु मोहिनीहुनि भली कथा हे तुजी ॥
अभीष्टे फल द्यावया नतमनोरथा हेतु जी ॥
ह्मणाल जरि मीच त्या विषम काय दोषांत रे ॥

---

(१०४) १ देव व राक्षस. २ (नर+उरग)मनुष्यें व सर्प. ३ कथा टाकीत नाहीं. ४ मोक्षरस. ५ त्या मोहिनीला. ६ अमृतरस. ७ राहु केतूंस. ८ घोट घेत असता नां. ९ दया. १० ज्या मोहिनीला.

(१०५) १ इच्छित मनोरथ. २ विश्वास पावती. ३ राक्षस वचनी. ४ प्रख्यांत*जगास. ५ मोहिनी. ६ नशीबी. ७ ठकविते.

(१०६) १ अज्ञानी. २ आवडते बालक. ३ विषाला. ४ साखर. ५ आपले बालकास ठकविण्यानें ६ निर्दयता.

(१०७) १ मोहिनी पेक्षां२ इच्छा मनोरथ. ३ इच्छा नांदवा ४ भिन्न. ५ (सित +असित+ अभिध+ नदी+ सत्+ओघ) गंगा यमुना यांच्या अति उत्तम ओघा मध्यें.

जसा जनसिता ऽसितामिधनदीसदोघी तरे ॥१०७॥
अहा बहु विशुद्ध हें प्रभू तवस्वरूपाहुनी ॥
न भिन्नतनु त्या भले भजति एकता पाहुनी ॥
परंतु वदतों जनानुभव नातळो पाप गा ॥
तशी न यमुना गमे जशिगमे निर्लिपापगा ॥१०८॥
जगद्गुरुमहेश्वरप्रभुशिरीं जिचें नांदणें ॥
जिच्या जळमळें तुळे न शरदिंदुचें चांदणें ॥
प्रजा हरिहरा अशा यदुदरीं अनेका कवी ॥
भिऊनि ह्मणतील कां जशि सुधा तशी काकवी॥१०९॥
तुला स्वयमुनेसवें कुवलयद्युति श्यामला ॥
ह्मणाल जरि मोहिनी निजतनू अवश्या मला ॥
तुलीन अमृतोदधिप्रभव पुंडरीकामला ॥
कथा सुरधुनी सवें सुजन जींत विश्रामला ॥ ११०॥
शुकोदित पुराण ज्या श्रवण सन्मुखें साग्रही ॥

---

(१०८) १ निर्मळ. २ निराळा आकार. ३ गंगा व यमुना. ४ शाहाणें. ५ एकी. ६ सांगतो. ७ न लागो. ८ वाटे. ९ (निर्लिप+आपगा) देवांची नदी भागिरथी.

(१०९) १ (जगत्+ गुरु+ महा+ ईश्वर+ प्रभु+शिरीं ) शंकराच्या जटामध्यें. २ ज्या गंगेचे. ३ राहणे. ४ तुळणा. ५ शरत् ऋतूंतलें चांदणें. ६ ( यत्+उदरीं ) तिच्या पोटीं. ७ कचागुळ.

(११०) १ तुलनाकरा. २ कमलासारखी जिची कांती आहे अशी. ३ मोहिनी. ४ ( अमृत+ उदधि+प्रभव +पुंडरीक + अमल) अमृत समुदांतून उत्पन्न झालेल्या शुभ कमला सारखी स्वच्छ. ५ सुख पावला.

ह्मणेल अतुला[5] कथा ह्मणि ह्मणाल तो आग्रही ॥
न केवळ मलाचि हे निरुपमा यशोमंडितां[6] ॥
गुरूसहि[7] गमे पुसा स्ववरदा महापंडिता ॥ १११ ॥
प्रभो तुज न मोहिनी भुलवि मोहिला तोहि ती ॥
त्यजी जन नव्हे तशी तुज तुझी कथा मोहिती ॥
निजानुभवें[1] तूं पहा जशि महौषधी पारदा ॥
तुला स्थिर बळें करी कळविलें तुवां नारदा[2] ॥ ११२ ॥
सुरर्षि जवळीं स्वयें वदसि तत्र[2] तिष्ठामि[3] या ॥
तुझ्याचि वचनें ह्मणें तुज कथावश स्वामिया[4] ॥
जसा स्थिर कथेंत तूं स्थिर करीं तसें या मना[5] ॥
स्वभक्तसुरपादपा[6] सफल हे असो कामना[7] ॥ ११३ ॥
सुरर्षि ह्मणतो तुझें यशचि धन्य यो गायना ॥
मला कवि[1] ह्मणोत ते सुखद अन्ययोगायना[2] ॥
विमुक्ति[3] बहु साधनें तदितरें[4] गणीनाच तो ॥
सजूनि वर वल्लकी[5] तव सभांगणीं[6] नाचतो ॥ ११४ ॥

(१११) १ भागवत पुराण. २ परीक्षितीला. ३ (सत्+मुख) साधुंच्या मुखानें. ४ सायंत. ५ तुलना रहित. ६ कीर्तिनें शोभणारी. ७ तुमचा गुरु सांदीपनी ऋषी त्यालाहि तशीच वाटते.

(११२) १ (निज+ अनुभव) तुमचा अनुभव तुह्मीच पहा. २ हे सर्व नारदाला तुह्मीच कळवलें.

(११३) १ नारद. २ तेथें. ३ मी उभा आहे. ४ प्रभो. ५ या माझ्या मनाला. ६ कल्पवृक्षाला. ७ इच्छा.

(११४) १ वशिष्ठ, वामदेव, सनक, इत्यादि. २ दुसरे, मनाचे एकाग्रतेचें साधन. ३ मुक्ति विषयीं. ४ इतर. ५ श्रेष्ठ जी ब्रह्मवीणा ती. ६ तुमच्या मंदिरापुढें नाचतो.

तुझें चरित सन्मुखें श्रवण जाहलें यास्तवें ॥
प्रजापतिसुतत्वें ये करिति साधु ज्याचा स्तव ॥
स्वनीचपण मागिलें बहु दया अशी नारदा ॥
स्मरे घडिघडि प्रभो भवपयोधिच्या पारदा ॥ ११५ ॥
तुझें यशचि तारितें परि न केवळा तारवें ॥
सहाय असिला असे तरिच शत्रुला मारवे ॥
न भागवतें भेटतां न घडतांहि सत्संगती ॥
न अज्ञहृदयें तशीं तवयशोरसीं रंगती ॥ ११६ ॥
बुडे बुडवि सागरीं तरि सुकर्णधारा विना ॥
सहाय नसतां स्वयें परतटासि ती दाविना ॥
सहाय भगवज्जना तव सुकीर्ति जेव्हां करी ॥
तईंच उतरी भवोदधितटीं जना लौकरी ॥ ११७ ॥
सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो ॥
कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो ॥
सदंघ्रिकमळीं दडो मुरडितां हटानें अडो ॥
वियोग घडतां रडो मन भवच्चरित्रीं जडो ॥ ११८ ॥

(११५) १ ब्रह्मदेवाचे पुत्रत्व. २ स्तवनें. ३ दासी पुत्रत्व. ४पूर्वीचे. ५ संसार समुद्रा मधून पार नेणाऱ्या ईश्वरा!

(११६) १ तरवारीला. २ भगवद्भक्त. ३ साधुसमागम. ४ अज्ञान मनुष्याचें हृदय. ५ यशोरूपी रस.

(११७) १ समुद्रांत. २ नौका. ३ नावाडी. ४ स्वत:परतिरास. ५ (भव+ उदधि+ तटीं) संसाररूपी समुद्राच्या तीराला.

(११८) १ उत्तम संगति. २ सुजनाचें भाषण' ३ पाप. ४ बुद्धीचा. ५ साधूंच्या चरण कमळीं, ६ लीनहोवो. ७ काढून टाकतां. ८ तुटातूट झाली तर दु:खी व्हावें. ९ तुमच्या चरित्रांत.

न निश्चय कधीं ढळो कुजन[1]विघ्नबाधा टळो ॥
न चित्त भजनीं चळो मति सदुक्ति[2]मार्गीं वळो ॥
स्वतत्व[3] हृदया कळो दुरभिमान[4] सारा गळो ॥
पुन्हां न मन हें मळो दुरित आत्मबोधें[5] जळो ॥११९॥
मुखीं हरि वसो तुझी कुशल[1]धामनामावली ॥
क्षणांत पुरवील जी सकळ कामना[2] मावली[3] ॥
कृपा करिसि तूं जगत्त्रय[4]निवास दासांवरी[5] ॥
तशी प्रकट[6] हे निजाश्रित[7] जना सदा सांवरी[8] ॥१२०॥
दयामृतघना[1] अहो हरि वळा मयूराकडे ॥
रडे शिशु तयासि घे कळवळोनि माता कडे ॥
असा अतिथि धार्मिकस्तुतपदो[2] कदा सांपडे ॥
तुह्मां जड भवार्णवीं[3] उतरितां[4] न दासां पडे ॥१२१॥

## श्लोक.

कारुण्यांभोद राम प्रियसख गुरुही जो मयूरा नटाचा
होतां तापत्रयार्तें त्वरित भववनीं रक्षिता रानटाचा ॥
त्याचें साचें स्वभद्र स्मरण मग नतें त्या कसें ये कवीस
केका एका सख्यातें स्मरुनि करि अशा एकशें एकवीस ?

---

(११९) १ दुर्जन विघ्न करतात तर त्यानां पिडा होऊं नये. २ बुद्धि साधुंनीं उपदेशिल्या मार्गा कडेच वळो. ३ आपलें खरें स्वरूप ४ देहाभिमान. ५ ब्रह्मज्ञान.

(१२०) १ कल्याणाचें केवळ स्थानच अशी. २ इच्छा. ३ आई. ४ त्रिभुवन व्यापलेला असा. ५ भक्तजनावर. ६ नामावली. ७ आपले नामधारकांस ८ सदा सांभाळते.

(१२१) १ दयारूप अमृताची वृष्टि करणारामेघ २ धर्मशील जनांनीं स्तविली. ३ (भव+आर्णव) भवसमुद्र ४ पार पाडतां

## पृथ्वी.

तनू भववनीं त्रितापदवपावकें कावली ।
ह्मणोनि करुणास्वरें करि मयूर केकावली ॥
दयाघन हरि त्वरें करुनि भावुका सार हा ।
त्रिताप हरि त्या गमे स्वजनमीनकासार हा ॥१॥

## आर्या.

ऐकुनि विश्व सुखावे ज्या केकीचा अपूर्व तो टाहो ॥
त्याला ईशकृपेनें आयुष्याचा कधीं न तोटा हो ॥ १ ॥

समाप्त.